**<u>सह दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात</u>**

**नि.फौ.ख.क्र. ३०/२०२३.** **निशाणी क्र.१९**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची जबानी</u>**

<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की</u>,

माझे नाव – श्री. लहुकुमार संभाजी सुरवसे,

वय – ४४ वर्षे,

व्यवसाय – शेती.

राहणार – सोनारी ता. परंडा जिल्हा उस्मानाबाद(धाराशिव).

**<u>सरतपासणी सहा. सरकारी वकील श्री.व्ही.एस.गायकवाड साहेब यांचे मार्फत</u> –**

माझी शेती कंडारी रोडवर आहे. आम्ही सकाळी ०७.०० वाजता सिनाकोळेगाव डॅम तिथे गेलो व माझी मोटार का चालु झाली नाही याची पहाणी केली असता वायर चोरी गेल्याचे आढळुन आले. ती वायर ९० मीटर होती व तांब्याची होती. त्या वायरचे किंमत अंदाजे रुपये ४,५००/– होती. आणखी ब–याच लोकांची वायर चोरी गेली. दुस–या दिवशी मी पोलीस स्टेशनला जावुन तक्रार दिली. आता मला तक्रार दाखविण्यात आली, ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. तक्रारीस निशाणी क्र. २० देण्यात येते. पोलीसांनी सचिन गिरी व इतर यांचेकडुन वायर जप्त केल्याचे कळले. मी पोलीसांना पुरवणी जबाब दिला होता. तो माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला होता. पुरवणी जबाबातील मजकुर खरा व बरोबर आहे. मी आरोपीला ओळखु शकत नाही.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास श्री.एस.एस.जाधव वकील यांनी नाकारला.</u>**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2025.04.01 16:54:04 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–२८.०३.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.